
REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 1 | OCTOBER - 2018

# महात्मा फुले यांनी हंटर कमीशानला केलेल्या शिफारशी आणि आजची शिक्षण पद्धती

प्रा. डॉ. जयश्री महाजन
विभाग प्रमुख, समाजशास्त्र विभाग, मूळजी जेठा महाविद्यालय, जळगाव.

## प्रस्तावना :



ब्रिटीशपुर्व काळात भारतातील शिक्षण धोरण हे वर्णव्यवस्था, जातीव्यवस्थाआणि पुरुषसत्ता या शोषणसंस्थाना अनुकूल असे होते. बहुजन जातींना आणि स्त्रियांना ज्ञानापासून वंचित ठेऊन ब्राम्हण वर्गाने ज्ञानावर मालकी हक्क प्रस्थापित केला. बहुजन जातींची आणि स्रियांची गुलामगिरी कायम ठेवण्यासाठी ब्राम्हणांनी त्याचा वापर हत्यारासारखा केला. वर्णसमाजामध्ये व्दिजनवर्णाला शिक्षणाचा अधिकार होता. त्यामुळे तत्कालीन सामाजीतील शुद्र, अतिशूद्र लोकांना ज्ञानापासून वंचित ठेवण्यात आले. ब्रिटीशांनी भारतात आपली सत्ता प्रस्थापित केल्यानंतर त्यानी सर्वासाठी शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली आणि शिक्षणाचे सार्वत्रीकरण केले. असे जरी असले तरी ब्रिटीशांची शिक्षण व्यवस्था ही त्यांच्या वासाहातीक गरजेतून निर्माण झाली होती.

ब्रिटीश काळातील शिक्षणाचा विचार करताना मेकॉले या सारख्या विचारवंतानी त्यांना राज्यस्थापानेसाठी गरजेपोटी का होईना, आधुनिक शिक्षणाचा पाया घातला. ब्रिटीशांनीसुरु केलेल्या या व्यवस्थेतून जी पहिली पिढी शिकून बाहेर आली, त्याची या शिक्षणामूळे स्वतंत्र्य, समता, बंधुता, लोकशाही या सारख्या मूल्यांशी ओळख झाली. त्यातील जे तरुण ह्या मूल्यांच्या आधारे भारतीय समाजातील गुणदोषाची आणि तत्कालीन पारतंत्र्याची चिकित्सा करून सामाजिक आणि राजकीय चळवळी कडे वळले. त्यातील एक महत्वाचे नाव म्हणजे महात्मा ज्योतीबा फुले होय.

समानतेच्या तत्वाच्या दृष्टीने शिक्षणावर समाजातील सर्व मुला मुलींचा हक्क आहे. ही गोष्ट महात्मा फुले यांनी १८८४ मध्ये हंटर आयोगा समोर साक्ष देताना प्रथमच नोंदविली आहे. ब्रिटीश सरकार गोळा करीत असलेला बराचसा कर बहुजनांच्या घामातून उभा राहतो ह्या गोष्टीकडे लक्ष वेधून त्यांनी सरकारची शिक्षणवरची तरतूद ब्राम्हणी आणि उच्च जातीतील लोकांचे हित डोळ्यांसमोर ठेऊन केली जाते, असे प्रतिपादन केले. त्याच वेळी बहुजन मात्र अज्ञान आणि दारिद्र ह्या मध्ये खितपत पडलेला आहे ही गोष्ट नोंदविली. त्याच काळात महात्मा फुले यांनी मांडलेल्या शिक्षणविषयक विचार हा महाराष्ट्रातील शैक्षणिक चळवळीलावेगळी दिशा देणारा ठरला. तत्कालीन सामाजिक परिस्थिती मध्ये शिक्षणविषयक वेगळा विचार मांडण्यात आला. परंतु या सर्व विचारांमध्ये१८३४ मध्ये लॉर्ड मेकॉले यांनी मांडलेल्या झिरपत्या सिद्धांताने बहुतेक सर्व विचारांच्या, शिक्षण तज्ञांवर अधिराज्य गाजवित होता. झिरपता सिद्धांत याचा अर्थ असा की, 'शिक्षण प्रथम समाजाच्या वरच्या थरात उच्च शिक्षण दिले जावे. हे शिक्षण वरून झिरपत खालच्या थरापर्यंत येईल आणि अशा तऱ्हेने सर्व समाज शिक्षित होईल'. असा विचार या सिद्धांतामागे होता. या सिद्धांताच्या प्रभावाखाली अनेक विचारवंत वावरत होते. अशा परिस्थितीत महात्मा फुले यांनी या सिद्धांताला आव्हान दिले. यात त्यांनी सांगितले की, "आमच्या जातीबद्ध समाजामध्ये हा सिद्धांत यशस्वी रीतीने कार्य करू शकणार नाही. या देशात शिक्षण वरून खाली झिरपत जाणार नाही. त्याचा प्रसार करावयाचा असेल तर ग्रामीण भागातील सक्तीच्या प्रार्थमिक मोफत शिक्षणापासून सुरुवात केली पाहिजे. शिक्षण हे वरून झिरपत जाईल हा विचारच अवास्तव आहे. शिक्षणाच्या प्रसाराला समाजाच्या खालच्या स्तराकडूनच सुरुवात झाली पाहिजे, ते खालून वर गेले पाहिजे". असा विचार महात्मा फुले यांनी १८८४ सालच्या हंटर कमिशनला सादर केलेल्या अहवालात मांडला.

मेकॉलेच्या झिरपता सिद्धांताचे खंडन केल्यानंतर समाजाच्या खालच्या थरातून आपणास सुरुवात केली पहिजे हे सांगताना ते म्हणतात, "I think, primary education of massess should be made coumpulsory up to a certain age say at least 12 years".

महात्मा फुले हा विचार मांडण्याआधी सुमारे ५० वर्ष प्रचलित असलेल्या विचारला, त्यांच्या हंटर कमिशनला दिलेल्या निवेदनाने वेगळे कलाटणी दिली. महाराष्ट्राच्या शिक्षणिक इतिहासातील एक क्रांतिकारक विचार म्हणून महात्मा फुले यांच्या निवेदनाचा विचार करावा लागेल. भारतीय राज्यघटने नुसार सक्तीचे मोफत शिक्षण ही आपली नैतिक आणि कायदेशीर जबाबदारी आहे असे भारत सरकारने घोषित केले आहे. परंतु या सर्व विकासाची बीजे महात्मा फुले यांच्या विचारात आहेत हे लक्षात घेतले पाहिजे.

समानतेच्या तत्वाच्या दृष्टीने शिक्षणावर समाजातील सर्व मुलामुलींचे हक्क आहे ही गोष्ट महात्मा फुले यांनी १८८४ साली हंटर आयोग पुढे नोंदविली. 'ब्रिटीश सरकार गोळा करीत असलेला बराचसा कर हा बहुजनांच्या घामातून उभा राहतो. ह्या गोष्टीकडे लक्ष वेधून त्यांनी सरकारची शिक्षणावरील तरतूद आणि ब्राम्हणी आणि उच्च जातीतील लोकांचे हित डोळयासमोर ठेऊन खूप केली जाते'. असे प्रतिपादन केले. त्याच वेळी बहुजन मात्र अज्ञान आणि दारिद्य यात खितपत पडलेला आहे, ही गोष्ट त्यांनी हंटर आयोगापुढे नोंदविली.

## महात्मा फुले यांनी हंटर आयोगाला दिलेल्या निवेदनात शिक्षणासंदर्भात काही सूचना केल्या त्या पुढील प्रमाणे आहेत:

- शुद्र अतिशुद्रासह सर्वांसाठी प्रार्थमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत असायला हवे.
- शासनाने शैक्षणिक उन्नतीसाठी आर्थिक मदत करावी.
- मागास जातींसाठी विशेष आणि स्वतंत्र शाळा सुरु करावी.
- प्रत्येक शाळेत प्रशिक्षित शिक्षक असावा.
- मागास वर्गातील शिक्षकांची विशेष नेमणूक करण्यात यावी, जेणेकरून त्यांना मागास विद्यार्थ्यांच्या समस्यांची योग्य जाण असेल.
- उत्कृष्ट शिक्षक या क्षेत्रात यावे म्हणून त्यांना आकर्षक वेतन द्यावे.
- शहरी आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळे अभ्यासक्रम असावा. ग्रामीण, आदिवासी विद्यार्थ्यांसाठी त्यांना रोजच्या जीवनात उपयोगी पडेल आणि त्यांच्या कौशल्याला वाव मिळेल असा अभ्यासक्रम ठेवावा.
- दर तीन महिन्यानी 'शाळा तपासणी' व्हावी.
- शाळा योग्यप्रकारे चालविण्यासाठी शासनाने योग्य असे अनुदान द्यावे.
- शुद्र, अतिशूद्र विद्यार्थ्यांसाठी विशेष शाळा सुरु कराव्यात. जेणे करून शुद्र अतिशूद्र विद्यार्थी कुठल्याही दडपणाविना शिक्षण घेऊ शकतील.
- सर्व शाळा या शासनाच्या नियान्त्राखाली असाव्यात.
- सर्व शाळांमधून व्यावसायिक शिक्षण द्यावे ज्यामुळे प्रत्येक शिकलेल्या विद्यार्थ्याला नौकरी मिळेलच असे नाही, किमान तो स्वतःच्या उदरनिर्वाहासाठी व्यवसाय करू शकेल.

महात्मा फुले यांच्या या मागण्यांचा विचार केल्यास असे दिसून येते की, आज भारताला स्वातंत्र्याला मिळून ६० वर्षांपेक्षा अधिक वर्ष झाली तरी ही भारतातील कोट्यावधी स्त्री-पुरुष शिक्षणापासून वंचित आहेत. शासनकर्त्या वर्गाने हा राज्यघटनेशी तसेच महात्मा फुले यांच्या विचारांशी केलेला द्रोह आहे. स्वातंत्र्यानंतर कालखंडात नव्या भांडवलवादी लोकशाहीने शिक्षणाचा हक्क कायद्याने सर्वांसाठी खुला केला. RTE ACT 2009 सर्वांसाठी मोफत प्रार्थमिक शिक्षण राज्यघटनेनुसार मुलभूत हक्क असतांनाही अगोदर मुठभर उच्च शिक्षिण आणि नंतर सर्वांना प्राथमिक शिक्षण असे धोरण राबविले गेले. आजची मागास, अनुसूचित जाती, अनु. जमाती यांची शैक्षणिक स्थिती खालील तक्त्यावरून दिसून येते.

### अनुसूचित जाती साक्षरता

तक्ता क्र.१

| वर्ष | ग्रामीण साक्षरता | | | शहरी साक्षरता | | | एकूण साक्षरता | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | स्त्री | पुरुष | एकूण | स्त्री | पुरुष | एकूण | स्त्री | पुरुष | एकूण |
| १९६१ | २.५२ | १५.६ | ८.८९ | १०.४ | ३२.२१ | २१.८१ | ३.२९ | १६.९६ | १०.२७ |
| १९७१ | ५.०६ | २०.४ | १२.७७ | १६.०९ | ३८.९३ | २८.६५ | ६.४४ | २२.३६ | १४.६७ |
| १९८१ | ८.४५ | २७.११ | १८.४८ | २४.३४ | ४७.५४ | ३६.६० | १०.९३ | ३११.१२ | २१.३८ |
| १९९१ | १९.४५ | ४५.९५ | ३३.२५ | ४२.२९ | ६६.९० | ५५.११ | २३.७६ | ४९.९१ | ३७.४ |
| २००१ | ३७.८ | ६३.६६ | ५१.१६ | ५७.४९ | ७७.९३ | ६८.१२ | ४१.९० | ५४.६९ | ३४.७६ |
| २०११ | ५२.६० | ७२.६० | ६२.८० | ६८.६० | ८३.३० | ७६.२० | ५६.५० | ७५.२० | ६६.१० |
| २००१ ते २०११ मधील वाढ | ३९% | १४% | २३% | १९% | ७% | १२% | ३५% | ३८% | ९०% |

संदर्भ : Statstical Profile of Scheduled Tribes in India 2013

तक्ता क्र.२

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| संवर्ग/ जनगणनेचे वर्ष | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | २०११ |
| एकूण भारताची साक्षरता | २८.०३ | ३४.४५ | ४३.५७ | ५२.२१ | ६४.८४ | ७२.९९ |
| अनु. जमातीची साक्षरता | ८.५३ | ११.३० | १६.३५ | २९.६० | ४७.१० | ५८.९६ |
| एकूण फरक | १९.७७ | १८.१५ | १९.८८ | २२.६१ | १८.२८ | १४.०३ |

संदर्भ : Statstical Profile of Scheduled Tribes in India 2013

भारतातील ६ ते१४ वर्षातील २०% मुले आहेत अजूनही शाळाबाह्य आहेत. अशा पटावरील मुलांचे ५ वी पर्यंत गळतीचे प्रमाण २६% इतके आहे. ह्यात विशेषतः दारिद्र रेषेखाली, ग्रामीण, आदिवासी, झोपडपट्टी मधील मुलांची टक्केवारी असल्याचे समोर येते. भारत आजूनही विकसनशील देश असून या एक अब्जाच्या वर गेलेल्या लोकसंख्येपैके जवळपास ३५% जनता ही निरक्षर असल्याचे निदर्शनास येते. एकूण लोकसंख्ये पैकी २६% जनता ही अजूनही दारिद्र रेषे खाली आहेत. बहुसंख्य आदिवासी आणि ग्रामीण भागात शाळा नाहीत. आजतागायत ६० वर्षांपेक्षा अधिक कालावधी गेला परंतु शिक्षणापासून ग्रामीण आणि आदिवासी भाग वंचित आहे. या मागास समुदायास शिक्षणाचे महत्व पटवून देण्यात आपण आजही अपयशी आहोत. महात्मा फुलेंचे ज्ञानप्रसार अभिप्रेत होता. यापेक्षा भयावह चित्र म्हणजे ६-१४ वर्षाची ज्या मुलांची शाळेतील पाटावर नाव नाहीत त्यात ६०% मुली आहेत. म्हणजेच अजूनही मुलींच्या शिक्षणाकडे गांभीर्याने पहिले जात नाही. राजस्थान आणि बिहार मधील काही समुदायाच्या मुलींना शाळेतच पाठवले जात नाहीत. दारिद्र रेषे खालील कुटुंबातील मुलांना शाळेत जाणे शक्य होत नाही, याचे मुख्य कारण म्हणजे घरी असलेल्या भावंडाना लागते अथवा कामावर जाऊन अर्थाजनात सहयोग द्यावा लागतो. शाळेत जाणे म्हणजे चैन कारणे असा त्या समुदायाचा समज आहे. अशादेखील परीस्थीवर मात करून काही मुले शाळेतही पोहचतात परंतु त्यांना मुलभूत सुविधा देखील मिळत नाही. उदा. स्वच्छ पिण्याचे पाणी, संडास, शिकविण्याचा फळा -खडू नसतात वा शालेय पाठ्यपुस्तक, साहित्य यांचा मोठा अभाव दिसून येतो. त्यामुळे मुलांमध्ये शाळेविषयी गोडी निर्माण होत नाही आणि गळतीचे प्रमाण वाढत राहते. तसेच ग्रामीण, दुर्गम आदिवासी भागात प्रभावी

शिक्षण सुविधा नसल्याने उत्तम शिक्षक देखील आपली इच्छाशक्तीच्या अभावाचा यात भर टाकतात. हे मोठे प्रश्न आजच्या व्यवस्थेपुढे आहेत. लोकशाही आणि शिक्षण यांचा अतूट संबंध असतो हेच व्यवस्था समजून घेऊ इच्छित नाही.

१९९१ ला भारताला नवे आर्थिक धोरण सुरु होऊन नवउदारमतवादाचे खासगीकणाचे वारे वाहू लागले. सरकारने आपले कल्याणकारी कार्यक्रमांचे अंग झपाट्याने टाकून द्यायला प्रारंभ केला. शिक्षण, आरोग्य या विषयाला विक्रीय वस्तूचे स्वरूप प्राप्त होऊन ह्या सेवा बाजाराला जोडल्या जाऊ लागल्या. सबसिडी कमी होऊ लागली त्याच वर्षी जागतिक बँकेने थायलंड मधील जामेटीन या शहरामध्ये पहिली शिक्षण परिषद घेतली ह्या परिषदेचे नाव जरी सर्वांसाठी शिक्षण असे असले तरी त्यात सर्वांसाठी 'सारखे शिक्षण' ही कल्पना त्यात नव्हती. विकास कार्यात मदत हवी असेल तर सबसीडी कमी करण्याचा कार्यक्रम विकसनशील राष्ट्राला बँकेकडून दिला गेला. जामेटीन कार्यक्रम अजेंडा भारतीय व्यवस्थेने मान्य केला आहे. त्यानंतर सरकारचे धोरण म्हणून भारतीय समाजाच्या आर्थिक स्तराप्रमाणे शिक्षणातही स्तर तयार होवू लागले आहेत. जरी RTE Act 2009 च्या अन्वये सर्व खाजगी शाळांमध्ये गरीब कुटुंबातील मुलांना २५% आरक्षण देणे बंधन कारक असले तरी आज अनेक इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये गरीब कुटुंबातील मुलांना प्रवेश दिला जात नाही कारण अशा शाळांमध्ये उच्च वर्गातील कुटुंबातील मुले शिकतात व या शाळांचे शुल्क हे सामान्य कुटुंबाला परवडण्यासारखे नसते. ज्या मराठी वा शासनाच्या ज्या शाळा आहेत अशा शासकीय शाळांमध्ये मुलभूत सोयी सुविधांचा मोठा अभाव असल्याने त्यांना उच्च वर्गातील मुलांसारखे दर्जेदार शिक्षण मिळत नाही. देशातील प्रत्येक व्यक्तीला 'सारख्या दर्ज्याचे' शिक्षण मिळाले पाहिजे, तरच देशात समता प्रस्थापित होऊ शकेल.

आज सर्वाना समान दर्जाचे मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण मिळावे म्हणून देशातील अनेक संघटना कार्य करताना दिसत आहेत. जागतिक पातळीवरून मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत मिळते आहेच तरीही भारतीय समाजातील जो वर्ग शिक्षणापासून वंचित आहे अशा समुदायांमध्ये हक्काची जाणीव होत आहे. शिक्षांचे महत्व पटू लागले आहे. एक आशादायक चित्र निर्माण होत आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१) कीर धनंजय, महात्मा जोतीराव फुले, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई २००८.

२) नरके हरी , महात्मा फुले साहित्य आणि चळवळ, डॉ. बाबासाहेबआंबेडकर, महात्मा फुले, राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती. २००६